खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १७४, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०५ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## भारताच्या यंग ब्रिगेडची 'अंडर १९ वर्ल्ड कप' च्या फायनलमध्ये एंट्री

### उद्या इंग्लंड विरुद्ध रंगणार फायनल सामना !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, झिम्बाब्वे :** भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात U19 World Cup Semifinal Match रंगला. अफगाणिस्तानने या सामन्याचे नाणेफेक जिंकले आणि प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत अफगाणिस्तानने ३१० धावा केल्या. भारताच्या युवा संघाने हे लक्ष्य सहज गाठले आणि सामना ७ विकेट्सने जिंकला. भारतीय संघाने सेमीफायनलची मोहिम जिंकून आता फायनलमध्ये एन्ट्री मारली आहे.

भारताने अंतिम फेरीत पोहोचण्याचे स्पर्धेच्या इतिहासातील सर्वोच्च लक्ष्य गाठले. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने ४ बाद ३१० धावा केल्या. फैसल शिनोजादा आणि उजैरुल्लाह नियाझाई यांनी त्यांच्या संघासाठी शतके केली. आरोन जॉर्जच्या शतक आणि Vaibhav Suryavanshi आणि कर्णधार Ayush Mhatre यांच्या जबरदस्त अर्धशतकांमुळे भारताने ८.५ षटकांत सामना लवकर जिंकला.

**आरोन जॉर्जचा सामना जिंकणारा डाव...**

लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर वैभव सूर्यवंशीने ३३ चेंडूत ६८ धावांची स्फोटक खेळी केली आणि पहिल्या विकेटसाठी ९० धावा जोडल्या. त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रेने ५९ चेंडूत ६२ धावा केल्या. पण सामन्याचा खरा हिरो सलामीवीर आरोन जॉर्ज होता, ज्याने शानदार खेळी करत शतक झळकावले आणि भारतीय संघाला १९ वर्षांखालील एकदिवसीय विश्वचषक नॉकआउट सामन्यांच्या इतिहासातील सर्वोच्च लक्ष्य गाठण्यास मदत केली.

६ फेब्रुवारी रोजी भारतीय संघ अंतिम फेरीत इंग्लंडशी भिडणार आहे. त्यांनी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला हरवून जेतेपदाचा सामना खेळला. भारतीय संघ २०१६ पासून सलग १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचत आहे. पाच वेळा विजेतेपद जिंकून आणि एकूण १० वेळा अंतिम फेरीत खेळून, ते या स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ आहेत. ३११ धावा करून, टीम इंडियाने १९ वर्षांखालील विश्वचषक इतिहासातील सर्वोच्च लक्ष्य गाठले. त्यांनी २००६ मध्ये आयर्लंडविरुद्ध न्यूझीलंडचा ३०५ धावांचा विक्रम मोडला. त्यांनी २०२४ च्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मिळवलेल्या २४५ धावांच्या स्वतःच्या मागील विक्रमाला मागे टाकत १९ वर्षांखालील विश्वचषक बाद फेरीत सर्वाधिक लक्ष्य गाठण्याचा विक्रमही केला.

## २४ तासांपासूनची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मोठा प्रयत्न !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, पुणे :** गेल्या २२ तासांपासून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरती वाहतूक विस्कळीत झाली आहे. या महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ एका टँकरचा अपघात झाला. हा टँकर उलटल्याने वाहतूक कोंडी विस्कळीत झाली. या टँकरमधून अत्यंत ज्वलनशील मानला जाणारा प्रोपलीन गॅसची वाहतूक केली जात होती. टँकर उलटल्याने गॅसची गळती सुरु झाली. त्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं. अखेर सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक तातडीने थांबवण्यात आली. तेव्हापासून अनेक तासांपासून वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. अनेक किमी दूरपर्यंत वाहनांचा लांबच लांब रांगा लागलेल्या आहेत. ही वाहतूक कोंडी कधी फुटेल? असा प्रश्न प्रवाशांना सतावत आहे. या दरम्यान एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे.

आडोशी बोगद्याजवळ पलटी झालेल्या टँकरमधील गॅस ट्रान्सफर करण्यासाठी दुसरा टँकर घटनास्थळी दाखल करण्यात आला आहे. गॅस ट्रान्सफर करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. याआधीदेखील अपघातग्रस्त टँकर बाजूला करण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. पण त्यात प्रशासनाला यश आलं नव्हतं. अखेर घटनास्थळी दुसरा केमिकल टँकर आणण्यात आला आहे. या टँकरमध्ये आता गॅसचं ट्रान्सफर केलं जाणार आहे.

अपघातग्रस्त टँकरमधून दुसऱ्या टँकरमध्ये गॅस ट्रान्सफरची प्रक्रिया आता केली जाणार आहे. सध्या अपघातग्रस्त टँकरमधील प्रोपिलीन गॅस हळूहळू आणि अत्यंत काळजीपूर्वक दुसऱ्या टँकरमध्ये हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत टँकर हलवणे धोकादायक असल्याने तीव्र खबरदारी घेतली जात आहे.

या दरम्यान कोणतीही ठिणगी निर्माण होऊ नये म्हणून विद्युत पुरवठा, वाहनांची हालचाल व मानवी वर्दळ पूर्णतः नियंत्रित ठेवण्यात आली आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक तात्काळ पूर्णतः बंद करण्यात आली, तर पुण्याकडील वाहतूक मर्यादित स्वरूपात सुरू ठेवण्यात आली.



टँकर अपघातामुळे एसटीच्या १३९ फेऱ्या रद्द...

**टँकर अपघातामुळे एसटीच्या १३९ फेऱ्या रद्द**

दरम्यान, पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर झालेल्या टँकर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून या घटनेचा परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवांवर झाला आहे. परिवहन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, या अपघातानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यातील विविध विभागांमधील एकूण १३९ बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या. यामध्ये ७३ ई-शिवनेरी आणि ६६ इतर बस फेऱ्यांचा समावेश आहे.

तसेच, या एक्सप्रेस वेवर महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एकूण १६३ वाहने वाहतूक कोंडीत अडकली होती. यामध्ये सातारा विभागातील ४६, सोलापूर विभागातील ३६, पुणे विभागातील २०, सांगली विभागातील १८, कोल्हापूर विभागातील १३, पालघर विभागातील १२, ठाणे विभागातील ११ आणि मुंबई विभागातील ७ वाहनांचा समावेश आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, परिस्थितीचा आढावा घेऊन पर्यायी व्यवस्था उभारण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येतील, असे महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने कळविले आहे.

**पोलिसांकडून माणुसकीचं दर्शन**

या अपघातामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अनेक तासांपासून वाहनं स्थानबद्ध झाले आहेत. अनेक वाहनं हे २० ते २२ तासांपासून एकाच ठिकाणी आहेत. या वाहनांमधील प्रवाशांना पाणी आणि अन्न मिळणंही कठीण झालं होतं. अशा परिस्थितीत पुणे पोलीस हे देवदूत ठरले आहेत. पुणे पोलिसांकडून वाहतूक कोंडीत अडकलेल्या प्रवाशांना बिस्किटांचे पाकीट आणि पाण्याच्या बाटल्यांचं वाटप केलं जात आहे. पोलिसांकडून केलं जात असलेल्या या मदत कार्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरलही होत आहेत.

## नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर महामार्गास मंजुरी

### खासदार नीलेश लंके यांची माहिती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** केंद्रीय मंत्रिमंडळाने नाशिक – अहिल्यानगर – सोलापूर– अक्कलकोट या ६ पदरी, प्रवेश-नियंत्रित (ॲक्सेस कंट्रोल्ड) ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पास मंजुरी दिली असून, हा निर्णय अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्याचा समावेश राष्ट्रीय दर्जाच्या द्रुतगती महामार्ग जाळ्यात होणार असून, दळणवळणाच्या दृष्टीने अहिल्यानगरला नवे महत्त्व प्राप्त होणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

या महामार्गाची एकूण लांबी सुमारे ३७४ किलोमीटर असून, सुमारे १९ हजार १४२ कोटींची गुंतवणूक या प्रकल्पासाठी करण्यात येणार आहे. 'पीएम गतीशक्ती' राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत विकसित होणारा हा महामार्ग पश्चिम किनारपट्टीपासून दक्षिण भारतापर्यंतचा एक महत्त्वाचा दळणवळण दुवा ठरणार आहे. परिणामी राज्यातील आणि देशातील प्रमुख आर्थिक केंद्रांशी अहिल्यानगरचा संपर्क अधिक वेगवान व सुलभ होणार आहे.

महामार्गामुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे ४५ टक्के घट होण्याची शक्यता असून, त्याचा थेट लाभ व्यापार, शेती आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळणार आहे. शेतमाल, दुग्धव्यवसाय तसेच कृषी पूरक उद्योगांच्या वाहतुकीवरील खर्चात लक्षणीय बचत होणार असून, सूक्ष्म , लघु व मध्यम उद्योगांसाठी लॉजिस्टीक्स अधिक सक्षम होणार आहे. यासोबतच औद्योगिक, गोदाम, प्रकिया उद्योग आणि सोवा क्षेत्रात नव्या गुंतवणूकीस चालना मिळणार असल्याचे अपेक्षित आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना खासदार निलेश लंके यांनी सांगितले की,अहिल्यानगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा महामार्ग अत्यंत निर्णायक ठरणार आहे. अहिल्यानगर केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे तर आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या केंद्रस्थानी येणार आहे, दळणवळण, व्यापार,शेती, उद्योग आणि रोजगार या सर्वच क्षेत्रांना या प्रकल्पामुळे नवी दिशा मिळेल. केंद्र सरकारने अहिल्यानगरच्या विकास क्षमतेवर दाखवलेला विश्वास महत्वाचा असून, या महामार्गाचा जिल्ह्याला जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य पातळीवरील सातत्याने पाठपुरावा केला जाईल अशीही ग्वाही लंके यांनी दिली.

## माळेगाव एमआयडीसीत आगडोंब! पेपर रोल कंपनीच्या आगीत लाखोंचा कच्चामाल खाक



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, सिन्नर :** सिन्नर तालुक्यातील माळेगाव येथील शासकीय औद्योगिक वसाहतीत असलेल्या धनश्री पेपर रोल (प्लॉट नं. जी-५) या कोरिगेटेड बॉक्ससाठी पेपर रोल तयार करणाऱ्या कंपनीत मंगळवारी (दि. ३) मध्यरात्री साडेबारा ते एकच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत कंपनीच्या आवारात साठवलेला रद्दी पेपर व इतर कागद स्वरूपातील कच्चामाल खाक झाला.

कंपनीच्या आवारात उघड्यावर ठेवलेल्या कच्च्या मालाला आग लागल्याने काही वेळातच आगीने उग्र रूप धारण केले. कागदाच्या साहित्यामुळे आगीच्या ज्वाळा व धुराचे लोळ तब्बल दोन किलोमीटर अंतरावरून दिसत होते. धनश्री पेपर रोल कंपनी ही हिंदुस्तान पेट्रोलियमच्या एलपीजी गॅस बॉटलिंग प्लांटच्या शेजारी असल्याने औद्योगिक वसाहतीत मोठ्या अपघाताची भीती निर्माण झाली होती. माळेगाव अग्निशमन दलासह 'एमआयडीसी', सिन्नर नगरपरिषद, नाशिक महापालिका व हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले.

विविध अग्निशमन दलांच्या बंबांनी सात फेऱ्या करीत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. सकाळी सातच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले असले, तरी दुपारी एक वाजेपर्यंत हवेमुळे ठिकठिकाणी आग पुन्हा पेटत होती. त्यामुळे एमआयडीसी व नगरपरिषदेचे अग्निशमन बंब उशिरापर्यंत घटनास्थळी तैनात ठेवण्यात आले होते. या आगीत जीवितहानी झाली नसल्याची माहिती कंपनीचे मालक भावेश पटेल व व्यवस्थापक राजेंद्र पवार यांनी दिली.

**पांगरीत सव्वा लाखाचा मका, चारा खाक...**

सिन्नर तालुक्यातील पांगरी येथे वीजेच्या तारांमध्ये निर्माण झालेल्या घर्षणामुळे पडलेल्या ठिणग्यांमुळे शेतकऱ्याच्या शेतातील मका व चारा आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याची घटना सोमवारी (दि.२) दुपारी घडली. या आगीत सुमारे सव्वा लाखाचे नुकसान झाले. पांगरी-धारणगाव रस्त्यावर सोमनाथ निरगुडे यांची वस्ती असून, त्यांनी शेतात मका पीक घेतले होते. पीक काढणीनंतर शेतातील खळ्यात पाच ते सहा ट्रॅक्टर चारा तसेच त्याशेजारी तीन ते चार ट्रॅक्टर मक्याच्या बिट्ट्या साठवून ठेवल्या होत्या. वीजेच्या तारांमध्ये पक्ष्यांमुळे घर्षण होऊन आगीच्या ठिणग्या पडल्या.

## सोयगाव तालुक्यात पोलिसांचे पथसंचालन



**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.०४, सोयगाव :** जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांच्या अनुषंगाने बुधवारी आमखेडा गटासह जरंडी, निंबायती,बहुलखेडा, तिडका,बनोटी आणि गोंदेगाव या सात गावात सोयगाव पोलिसांनी पथसंचालन केले दंगा काबू पथकासह सोयगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल, उपनिरीक्षक गजानन आरेकर यांच्या नेतृत्वाखाली दंगा काबू पथक,स्थानिक कर्मचारी सादिक तडवी, अजय कोळी,गजानन दांडगे,श्रीकांत तळेगावे,आदींसह तीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने आमखेडा, जरंडी, बनोटी, गोंदेगाव या प्रमुख गावांसह सात गावात पथसंचालन घेतले तालुक्यात मतदान कालावधीत कायदा व सुरक्षा अबाधित राहावी यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे दरम्यान मतदान कालावधीत कोणीही कायदा हातात घेतल्यास त्याची गय केली जाणार नाही असे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी सांगितले.

# पाकिस्तानात बलुच आणि सिंध प्रांतात स्वातंत्र्यासाठी आंदोलन...

पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानसाठी बलुचिस्तानी नागरिकांनी सरकारविरोधात एल्गार पुकारून सरकारला आवाहन दिले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढा पुकारून स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा देखील केल आहे. मागील काही महिन्यांपासून बलुच लिबरेशन आर्मी आणि पाकिस्तानी लष्कर यातील संघर्ष वाढत चालला आहे. आताही तिथे मोठा हिंसाचार चालू असून बलुच नॅशनल आर्मीने बलुचिस्तान मधील काही भूभाग बळकावला असल्याची बातमी वाचायला मिळाली.

बलुच आर्मी आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात तिथे तुंबळ लढाई सुरू असून बलुचिस्तान लिबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान लष्कराला लष्कराला अक्षरशः नाकेनऊ आले आहे. सीमेवर भारतीय लष्कराशी आणि सीमेच्या आत बलुचिस्तान लीबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान अक्षरशः भिकेकंगाल झाला आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याने पाकिस्तान जगात भिकेचा कटोरा घेऊन फिरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला निधी दिला असला तरी त्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. पाकिस्तानात महागाई इतकी वाढली आहे की पाकिस्तानी नागरिकांना एकवेळचे जेवण मिळणे देखील मुश्किल झाले आहे. महागाईने जनता मेटाकुटीला आली आहे. त्यात भारताने सिंधू जल करार स्थगित केल्याने पाकिस्तानी नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची देखील वेळ आली आहे. जर भारताने हा जल करार पूर्ववत केला नाही तर भविष्यात पाकिस्तानात मोठी पाणीबाणी निर्माण होऊ शकते यावर तोडगा म्हणून पाकिस्तानच्या शरीफ सरकारने ग्रीन पाकिस्तान इनिशीएटीव्ह हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प चीनच्या मदतीने पकिस्तान साकारणार आहे. या प्रकल्पास पाकिस्तानची दुसरी हरित क्रांती संबोधली जातेय. या प्रकल्पाअंतर्गत पाकिस्तानातील चेलिस्तान वाळवंटातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी शेकडो किलोमिटरची सहा कालवे काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाकडे पाकिस्तान सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहण्यात येत आहे मात्र हाच प्रकल्प आता पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनला आहे कारण या प्रकल्पाने सिंध प्रांतात येणारे पाणी पंजाब प्रांतात वळवले जाईल असे सिंध प्रांतातील नागरिकांना वाटते. आपल्या हक्काचे पाणी पंजाब प्रांताला मिळणार असल्याने सिंध प्रांतातील नागरिक प्रचंड अस्वस्थ आहेत या अस्वस्थतेतूनच तेथील नागरिक रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकारविरुद्ध आंदोलन करत आहेत. भारत आणि बलुचिस्तान आर्मी पुढे हतबल झालेल्या शरीफ सरकारपुढे ही नवी डोकेदुखी उभी ठाकली आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील लोकही आता सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. हे आंदोलन देखील हिंसक बनले आहे. काही दिवसांपूर्वी संतप्त आंदोलकांनी सिंध प्रांतातील गृहमंत्र्यांच्या घराला आग लावली होती यावेळी झालेल्या गोळीबारात तीन नागरिकांचा मृत्यू झाला होता. हे आंदोलन वाढतच चालले आहे. पाकिस्तान लष्कर आणि सरकारमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. पाकिस्तान सरकार सिंध प्रांतावर कायम अन्याय करीत असल्याची भावना तेथील नागरिकांची झाली आहे. या अन्यायाविरोधात सिंध प्रांतातील नागरिक आवाज उठवत आहेत. इतकेच नाही तर या




आंदोलनात सिंध प्रांतातील नागरिकांनी स्वतंत्र सिंधू देशाची मागणी केली आहे. ही मागणी आताच नव्हे तर मागील काही वर्षांपासून करण्यात येत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात हिंदू धर्मीय नागरिक मोठया प्रमाणात राहतात. या नागरिकांवर गेल्या काही वर्षांपासून अन्यायाची मालिका सुरू असून ही अन्यायाची मालिका संपावी आणि सिंध प्रांतातील हिंदू नागरिकांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावेत यासाठी जगभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. मागील काही काळात पाकिस्तानातील हिंदू महिलांवर विशेषतः सिंधी हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. या भागातील मुलींचे, महिलांचे फसवून, पळवून, सक्तीने धर्मांतर केले जात आहे. वाढत्या अत्याचारामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वारंवार सरकारला विनंती करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तेथील नागरिक अस्वस्थ होते त्यातच या नव्या प्रकल्पाची भर पडल्याने तेथील नागरिकांची अस्वस्थता आणखी वाढली. आपल्यावर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्वतंत्र सिंधू देशाशिवाय पर्याय नाही अशीच भावना तेथील नागरिकांची झाली आहे त्यातूनच स्वतंत्र सिंधू देशाची मागणी करण्यात आली. मागील वर्षीच स्वतंत्र सिंधू देशाला भारत आणि अमेरिकेने पाठिंबा द्यावा अशी विनंती करण्यात आली होती. त्यावर दोन्ही देशांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भविष्यात या दोन्ही देशांना आंदोलनकर्त्यांच्या या मागणीची दखल घ्यावीच लागेल आणि जेंव्हा हे दोन्ही देश या मागणीची दखल घेतील तेंव्हा पाकिस्तानची आणखी शकले झालेली असतील. भारताचे शकले करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानचेच शकले होण्याची वेळ आली आहे. काश्मीरला स्वतंत्र करून भारताची शकले करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानला बलुच आणि सिंध प्रांतातच स्वातंत्र्याची आंदोलने होऊ लागल्याने पाकिस्तानचीच शकले होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भविष्यात पाकिस्तानातून बलुचिस्तान आणि सिंध हे दोन नवीन देश निर्माण झाले तर आश्चर्य वाटायला नको.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# साहित्यनगरी कोळीकोड



अवकाशातून पृथ्वीकडे पाहताना, वसुंधरेवरील सर्व वादविवाद आणि संघर्ष निरर्थक वाटतात. आपण सर्व मानव, तसेच पशु-पक्षी या ग्रहावर एकत्र राहत आहोत. आपणा सर्वांचे हेच निवासस्थान आहे, तरीही आपण का भांडतो, असा प्रश्न पडतो' हे विचार आहेत, भारतीय वंशाच्या अमेरिकी अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांचे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावरील तीन मोहिमांचा आणि तब्बल सहाशे दिवस अवकाशात राहण्याचा अनुभव असलेल्या विल्यम्स यांनी हे विचार मांडले ते केरळ लिटरेचर फेस्टिव्हलच्या (केएलएफ) व्यासपीठावर. गेल्या आठवड्याच्या सुरुवातीला कोळीकोड येथे झालेल्या या साहित्योत्सवाच्या त्या एक प्रमुख आकर्षण होत्या. साहित्योत्सवाशी अंतराळवीराचा काय संबंध, असा प्रश्न कोणी विचारूही शकतो; परंतु साहित्य हे सर्वस्पर्शी असल्याने विविध विषयांवर मंथन घडवून आणणे हाच अशा उत्सवाचा मुख्य हेतू असतो. गेल्या नऊ वर्षांपासून केरळ साहित्योत्सव तो अत्यंत गांभीर्याने साध्य करीत आहे.

'केएलएफ'मधील यंदाच्या सहभागी वक्त्यांची यादी त्याची समृद्धी स्पष्ट करणारी आहे. अब्दुलरझाक गुरनाह आणि अभिजित बॅनर्जी हे अनुक्रमे साहित्यातील आणि अर्थशास्त्रातील 'नोबेल'विजेते, विख्यात लेखक सलमान रश्दी, पिको अय्यर, इतिहासकार रोमेला थापर, 'बुकर'विजेत्या किरण देसाई, 'ज्ञानपीठ'विजेत्या प्रतिभा राय, ख्यातनाम अभिनेते प्रकाश राज, काँग्रेसचे नेते शशी थरूर, 'विकिपीडिया'चे सहसंस्थापक जिमी वेल्स अशी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवरील दिग्गजांनी महोत्सवात विचार मांडले. तब्बल साडेतीनशे सत्रे, ५८६ वक्ते आणि चार दिवसांत सुमारे सात लाख साहित्यरसिकांनी लावलेली वर्दी यांतून या महोत्सवाच्या गुणवत्तेची कल्पना यातून येते. ज्या कोळीकोड शहरात हा महोत्सव भरला, ती भारतातील एकमेव 'साहित्यनगरी' आहे. २०२३मध्ये 'युनेस्को'ने कोळीकोडला हा दर्जा बहाल केला. ग्रंथ आणि साहित्य यांचा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या शहरांना 'युनेस्को'तर्फे २००४पासून हा दर्जा दिला जातो. सध्या ३९ देशांतील ५३ शहरे 'साहित्यनगर' म्हणून ओळखले जातात.

केरळच्या किनारपट्टीवरील सुमारे वीस लाख लोकसंख्येच्या कोळीकोडचा साहित्यासाठी लौकीक निर्माण झाला, तो तेथील साहित्यिक, वाचनसंस्कृती आणि साहित्यरसिक यांच्यामुळे. साहित्य परंपरेचा लिखित इतिहास, लेखक-प्रकाशकांची, प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची आणि ग्रंथालयांची संख्या, साहित्य विषयक कार्यक्रम अशा अनेक निकषांवर कोळीकोडने 'साहित्यनगरी'चा दर्जा कमावला आहे. कोळीकोड जिल्ह्यात ५४५ ग्रंथालये आहेत. कोळीकोड हे केरळचे प्रमुख साहित्य-संस्कृती केंद्र. वैकोम महंमद बशीर ऊर्फ 'बेपोर सुलतान', एस. के. पोट्टेकट, 'ज्ञानपीठ'विजेते एम. टी. वासुदेवन नायर, उरुब, तिक्कोडियन, सुकुमार अळिकोड, पी. वलसा आदी मल्याळी भाषेतील ख्यातनाम साहित्यिक कोळीकोडचेच. वैकाम महंमद बशीर यांनी आपल्या लेखन आणि कथन शैलीने मल्याळी साहित्यात आमूलाग्र बदल घडवले. अशा दिग्गज साहित्यिकांचा वारसा, साहित्य-संगीत-कला यांच्यासाठीच्या संस्था, कार्यक्रम यांनी कोळीकोड समृद्ध होत गेले. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याला कोळीकोडप्रमाणेच साहित्य-संस्कृतीचा वारसा आहे. पुण्याने अनेक नामवंत साहित्यिक दिले आणि अन्य शहरांतील साहित्यिकांना आकर्षितही केले. साहित्य संस्थांचे जाळेही पुण्यात आहे. ग्रंथालयांची संख्या अलीकडे रोडावत आहे हे खरे; परंतु येथे वाचनसंस्कृती आहे. वसंत व्याख्यानमालेपासून उपनगर साहित्य संमेलनांपर्यंत आणि विविध संगीत कार्यक्रमांपासून सांस्कृतिक उत्सवांपर्यंत विविध कार्यक्रमांची रेलचेल पुण्यात वर्षभर असते. गेल्या तीन वर्षांपासून 'पुणे पुस्तक महोत्सवा'ने पुण्याचा लौकीक वाढविला आहे. पुस्तकांच्या जागतिक नकाशात पुण्याला नेण्याचा संकल्पही सोडला गेला आहे. तो सिद्धीस नेण्यासाठीच्या सध्याच्या प्रयत्नांबरोबरच खरे आव्हान आहे, ते पुण्यातील साहित्य-संस्कृतीच्या वारशाचा दस्तवेज तयार करण्याचे, साहित्यविषयक कार्यक्रमांची गुणवत्ता उंचावण्याचे, वैचारिकता वाढविण्याचे. ते पेलण्याचा मार्ग कोळीकोडने आणि केरळ साहित्योत्सवाने दाखविला आहे. साहित्य संस्थांच्या राजकारणात आणि 'इव्हेंटीकरणा'त रमलेले धुरीण आणि पुणेकर रसिक हे आव्हान पेलतील?

# रूक जाना नहीं तू कहीं हार के...

विविध भारती या रेडिओ चॅनलवर नुकतेच एक अर्थपूर्ण हिंदी गीत ऐकायला मिळाले. जीवनात जर कोणत्याही कारणाने अपयश आले तर खचून न जाता व हार न मानता पुन्हा एकदा नव्याने जीवनाची सुरुवात नव्या जोमाने व नव्या उत्साहाने करायची असते असा संदेश देणारे गीत ऐकून मनाला आल्हाददायक गारवा मिळाला. हे गीत अतिशय मार्मिक आणि अमूल्य असा संदेश देणारे आहे. त्या गाण्याचे बोल खालील प्रमाणे आहेत-

**रूक जाना नहीं तू कहीं हार के**
**काँटो पे चलके मिलेंगे सायें बहारके**

हे गीत ऐकताना मन गहिवरून आले होते.या गीतांचे संगीत खूप श्रवणीय आहे.हे गीत मानवी जीवनातील नैराश्य दूर करते आणि मनात आशावाद निर्माण करते.

आपण नेहमी पाहतो की बहुतांश लोक जीवनात अपयश आल्यावर, कँसर सारखा जीवघेणा आजार झाल्यावर, कोणी अपमान केल्यावर आणि न केलेल्या चुकीची शिक्षा मिळाली तर निराश होऊन जीवन जगणं सोडून देतात. मन हळवे करून जीवनाचे बरेवाईट करून घेतात. १० वी व १२ वी च्या परीक्षेत पेपर अवघड गेल्यावर काही विद्यार्थी आत्महत्या करतात. स्पर्धा परीक्षेत मनाजोगे यश नाही मिळाले, वेळेवर नोकरी नाही मिळाली तर काही तरूण तरूणी फस्ट्रेशनमध्ये जातात. काही विद्यार्थी नीट व जेईई परीक्षेत अपयश आल्यावर जीवाचे बरेवाईट करून घेतात. अशा अनेक वाईट घटना सध्या खूप प्रमाणात घडत आहेत. कर्जाच्या कचाट्यात एकदा अडकल्यानंतर त्यातून बाहेर पडण्यासाठी धडपडताना पदरी घोर निराशा येते तेव्हा




हवालदिल झालेले शेतकरी गळफास घेऊन या दुष्ट जगाचा कायमचा निरोप घेतात. हुंड्यासाठी अतोनात शारिरीक व मानसिक छळ सोसणाऱ्या नववधू जेव्हा सासुरवास सहनशीलतेच्या पलिकडे पोहचतो तेव्हा मृत्यूला जवळ करतात. काही क्षेत्रातील नोकरदार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून स्वतःच्या डोक्यात बंदुकीची गोळी झाडून घेतात आणि मृत पावतात. अशा अनेक घटना भूतकाळात घडलेल्या आहेत आणि सध्या वर्तमानात पण घडत आहेत.

निराश होऊन आणि आता जीवनात काहीच रस उरला नाही अशी मानसिकता तयार करून घेऊन अनेकांनी आत्महत्या केल्याच्या इतिहासात नोंदी आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुध्दा गोरगरीब जनतेच्या जीवनात काहीच बदल होताना दिसला नाही तेव्हा तेव्हाची भारतातील आर्थिक विषमता पाहून साने गुरुजींनी स्वतःहून या जगाचा निरोप घेतला होता. हे वाचून वाचकांचे मन हळहळ व्यक्त करते. वाचकांच्या मनात साने गुरुजींबद्दल आस्था निर्माण होते.

पण एक महत्त्वाची गोष्ट या लेखाच्या माध्यमातून स्पष्ट करावी वाटते की, आत्महत्या केल्याने प्रश्न सुटत नाहीत. आत्महत्या करणारा कायमचा मरतो पण त्याचे जीवंत नातेवाईक आतून पुरते खचून जातात.आणि जीवंत असुनही सतत मरत असतात,झुरत असतात. म्हणून आत्महत्या करण्यापेक्षा आलेल्या संकटाला हिमतीने सामोरे जा. जे अतीव दुःख वाट्याला येते त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवा परंतु आत्महत्या मुळीच करू नका. फुकटात मरण्यापेक्षा जीवनाची लढाई लढून रणांगणात वीरमरण पत्करणे केव्हाही लाख पटीने चांगले.

जीवन ही एक रोजचीच जीवघेणी लढाई आहे.कोठून केव्हा कसे संकट येईल आणि जीवनाची राखरांगोळी करुन टाकेल याचा काही नेम नाही. जीवनात भ्रमर आणि धावपळ ठरलेली आहे. दुःखानंतर सुख आणि सुखानंतर दुःख ठरलेले आहे. दोन्ही गोष्टी पचवता आल्या पाहिजेत. संकटाच्या छाताडावर पाय रोवून उभे राहिले पाहिजे. तेव्हा हार मानून आतल्या आत खचून जाऊ नका आणि जीवनप्रवास थांबवू नका. आशावादी दृष्टिकोन ठेवून जीवनाची वाट चालत राहा. आणि मि.इंडिया या चित्रपटातील गाणे नेहमी लक्षात ठेवा -

**जिंदगी की यही रीत है**
**हार के बाद ही जीत है**

शेवटी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की माणूस नेहमी आशेवर जगतो. आज नाही तर उद्या नक्कीच चांगले होईल हा आशावाद मनुष्य जीवनाला सुंदर करून टाकतो. म्हणून अपयशाने व संकटाने खचून जीवनप्रवास थांबवू नका. वाहत्या नदीप्रमाणे आपला जीवनमार्ग पुढे पुढे हळूहळू चालत राहा. हेच मानवी जीवनाचे खरे वास्तव आहे!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२**

# लोणार सरोवराच्या काठी रंगला पाणथळ दिन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, लोणार :** रामसर साईट असलेल्या लोणार सरोवर येथे 'मी लोणारकर' टीम व अकोला वन्यजीव वन विभाग अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पाणथळदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७:३० वाजता पक्षी निरीक्षण, सरोवर भ्रमंती व स्वच्छता मोहिमेने चालू झाली पाणथळ जागा व पक्षांची माहिती महाराष्ट्र पक्षी मित्र जिल्हा समन्वयक तसेच 'मी लोणारकर' टीमचे सचिन कापुरे यांनी विद्यार्थ्यांना दिली. पाणथळ जागेचे महत्त्व संतोष जाधव यांनी तर स्वच्छतेचे महत्व लोणार रेंज ऑफिसर वन्यजीव विभागाचे अधिकारी मनोज रामटेके यांनी विद्यार्थ्यांना दिली. सरदार वल्लभ भाई पटेल हायस्कूल येथील शिक्षक वृंद तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते तसेच 'मी लोणारकर टीमचे विलास जाधव, उमेद चिपडे, सर्पमित्र विनय कुलकर्णी, कमलेश आगरकर, प्रकाश सानप, वनपाल सदाशिव वाघ, वनरक्षक पोले, ठाकरे व लोणार वन्यजीव विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

लोणार सरोवर हे महाराष्ट्रातील दुसरे, तर देशातील ४१ वे रामसर स्थळ ठरले आहे. जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाणथळ जागा उदा. तलाव, नद्या, खाड्या, दलदलीचे प्रदेश सरोवर यांचे संरक्षण करणे या हेतूने २ फेब्रुवारी ला आपण जागतिक पाणथळ दिवस साजरा करतो या वेळी ची थीमपाणथळ जागा आणि पारंपारिक ज्ञान: सांस्कृतिक वारसा साजरा करणेअशी संकल्पना निवडण्यात आली आहे.

# किंग मेकर



किंग मेकर बनायचे
प्रसंग असता बाका
काहीकरुन बसायचे
सत्ताधा-यांच्याबाका

असोत बलाढ्य पक्ष
वेसण घालावी नाका
सगळी वाहने थांबली
महत्व पूर्ण टोलनाका

वेगातचालल्यागाड्या
खीळघालायची चाका
लोटांगणघाले मालक
जाम करायचा चक्का

पलटू शकतो खेळास
ठेवायचे नेहमी धाका
नसे मुळी सोयरेसुतक
कधीही द्यायचा धोका

सुसंधीआलेली दारात
कशाला सोडवी मोका
वाळवंटी संसार करायं
भले उंटाचा घ्या मुका

सारीपाट फिरे कसाही
बहीणी दादोबा काका
पाय पाहू नका मोरांचे
आनंदाचा ऐकवा केका

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# पारनेर नगरपंचायतीस १ कोटींचा निधी मंजूर - आ.दाते
## अजित दादांच्या विकास दृष्टीचे अंतिम फलित



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाच्या विकासात्मक वाटचालीत स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान नेहमीच मार्गदर्शक ठरले आहे.

त्यांच्या लोककल्याणकारी दृष्टीकोनातून व पारनेर वरील अपार प्रेमातूनच बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत पारनेर नगरपंचायतीस १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांन दिली.

आमदार दाते म्हणाले की, या निधीतून पारनेर शहरातील मराठी शाळांची गुणवत्ता वाढविणे, महिला आरोग्य व सर्वसाधारण आरोग्य सुविधा बळकट करणे, पर्यावरण संवर्धन, नागरी स्वच्छता तसेच पर्यटन विकास यांसारख्या लोकाभिमुख कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या निधीच्या माध्यमातून पारनेर शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम होतील, विकासकामांना गती मिळेल आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंसह स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या लोककल्याणकारी विचारांना प्रत्यक्षात आणण्यास मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने अधिकृत शासन निर्णय जारी केला असून, हा निधी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या अभियानांतर्गत मंजूर करण्यात आला असून सबंधित निधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांसह महायुती सरकारमधील सर्व सहकार्यांचे अनमोल सहकार्य लाभले असल्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले.

**पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. स्वर्गीय अजितदादा पवार यांनी त्यांच्या आयुष्यात अखेरच्या टप्प्यापर्यंत पारनेरच्या विकासासाठी काळजी घेतली. नगरपंचायतीसाठी यापूर्वी सुमारे १८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून हा नव्याने मंजूर झालेला १ कोटी रुपयांचा निधी म्हणजे त्यांच्या विकासदृष्टीचे अंतिम आणि भावनिक प्रतिबिंब आहे.**

# पाटण तालुक्यातील निकृष्ट रस्त्याच्या कामाची चौकशी करणार : बांधकाम मंत्री भोसले

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०४, पाटण (सातारा) :** सार्वजनिक बांधकाम खात्याकडून पाटण तालुक्यात निकृष्ट दर्जाची अनेक कामे झाली आहेत. या कामातून अनेकांनी स्वत: ची घरे भरण्याची कामे केली आहेत. अशा निकृष्ट कामांची चौकशी करून संबंधित ठेकेदारांवर कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकणार. शेवटी पैसा हा जनतेचा आहे. जनतेच्या पैशातून होणारी कामे ही टिकाऊ आणि उत्कृष्टच झाली पाहिजेत. असा इशारा देत आपला कोणाला त्रास होत नाही. आपल्याला दिलेला त्रास आपण विसरत नाही तर कोणतीही चिंता तुम्ही करू नका. मुख्यमंत्री आपल्या पाठीशी आहेत. विकासकामाना निधी कमी पडणार नाही.

म्हणून भाजपाला साथ देऊ असे सार्वजनिक बांधकाम मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गोकुळ तर्फ हेळवाक जि.प. आणि पं.स. गण व येराड पं.स. गणातील मतदार संघातील उमेदवारांच्या प्रचारार्थ मष्टेवाडी (पाटण) येथे झालेल्या सभेत बोलताना सांगितले.

यावेळी पाटण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर, ऐश्वर्यादेवी पाटणकर, जि.प. उमेदवार दत्तात्रय (बाळासाहेब) कदम, येराड पं.स. गणाचे उमेदवार सौ.वंदना शिंदे, नंदकुमार सुर्वे, चैतन्य दळवी, सागर माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

**सातार्‍यात कोण आलेले लगेच कळत...**

आम्ही आमच्या वडीलधार्‍या माणसांकडून चांगलेपण शिकले. आपल्या लोकांमध्ये लोकांसारखे जायचं.. लोकांसारखे राहिच.. आपलं वेगळेपण कधी दाखवायचं नाही. चांगले लोक चांगल्या ठिकाणी आलेले चांगले असतात. मी कॅबिनेट मंत्री आहे. मी चांगल्या लोकांच्यात आलेलो कोणाला कळाले काय. सातार्‍यात कोण आलेले लगेच कळत.. असा टोला लगावताना यांवर उपस्थितांच्यात एकच हशा झाला.



मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले पुढे म्हणाले लोकशाहीत सतेची चावी मतदार यांच्याकडे असते. भाजप उमेदवार याना बहुमोल मतदान द्यावे सत्ता, पदे सर्वसामान्य लोकांच्या प्रगतीसाठी आहेत. आम्हाला कामाचा वारसा आहे तो लक्षात ठेऊन वाटचाल करतोय. आम्ही सांगू ते काम शंभर टक्के होईल. या विभागातील पुलाच्या कामास मान्यता दिली आहे. बजेटमध्ये उर्वरित कामेही घेऊ. तालुक्यातील धरणाची अपुरी कामे त्याबाबतही लक्ष घालू. आपले प्रलंबित प्रश्न मुख्यमंत्र्या यांच्या माध्यमातून सोडूऊ. आम्ही सर्व मंत्री पाटणच्या जनतेच्या पाठीशी आहे. फक्त ९ तारखेला गुलाल घ्यायचाच. काम करणार्‍याच्या मागे आपण राहावे. सत्यजीत दादांच्या पाठीशी ताकदीने उभे राहा आणि भाजपचे उमेदवार निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

भाजप नेते सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले जि.प.पं.स. ही निवडणूक ग्रामीण भागाच्या विकासाचा कणा आहे. एक वेळ अपवाद सोडला तर ४० वर्ष जिल्हा परिषद व पंचायत समिती आपल्या ताब्यात आहे. आणि यापुढेही ती आपल्याच ताब्यात ठेवायची आहे. पालकमंत्री नुसती आश्वासने देतात. दोनवेळा मंत्री असताना तालुक्याला दिलेली आश्वासने ते पूर्ण करू शकले नाहीत. विक्रमसिंह पाटणकर दादांनी तालुक्यात केलेली धरणांची कामे ते पूर्ण करु शकले नाहीत. धरणे पूर्ण नाहीत आणि १०० मीटर वर पाणी नेण्याच्या बाता मारतात.मध्यंतरी सर्व्हे करून नाटक केले. जनतेला अजून किती फसविणार..? आज वन्यप्राणीमुळे शेती सुरक्षित नाही, त्यासाठी वेळोवेळी आंदोलने केली. मात्र पालकमंत्री यांनी यांवर एक चकार शब्द काढला नाही. मात्र वनमंत्री नाईक यांनी प्रश्न सोडवू असे आश्वासन दिले आहे. १२ वर्ष आपण विकासापासूम वंचित होतो, मात्र भाजप प्रवेशमुळे विकासाचा झंझावात सुरू आहे. दिवशी व केरळच्या मध्ये केरा नदीवर पुल बांधण्यासाठी शिवेंद्रसिंहराजे बाबांनी सहा कोटी रुपये दिले. समाजात आपल्याला जायचे आहे, फक्त कमळ चिन्ह लक्षात ठेवायचे. डोळ्यात तेल घालून काम करा. आपला गड अबाधीत ठेवा. ज्या कामात भ्रष्टाचार केला त्या ठेकेदारांची चौकशी नक्की होणार असे त्यांनी शेवटी सांगितले. सभेस विभागातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुंडलवाडीच्या आरोग्य व बालकल्याण प्रश्नांसाठी निवेदनांचा धडाका
## नगराध्यक्षा कोटलावार यांचा प्रशासनाशी ठाम पाठपुरावा




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०४, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहर व परिसरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर आरोग्य व बालकल्याण सुविधांबाबत निर्माण झालेल्या समस्या व गरजा लक्षात घेता नगराध्यक्षा प्रेरणा कोटलावार यांच्या नेतृत्वाखाली संबंधित वरिष्ठ अधिकार्‍यांसमवेत सविस्तर चर्चा व निवेदने सादर करण्यात आली. कुंडलवाडी येथील नवीन ग्रामीण रुग्णालय तातडीने सुरू करण्यात यावे, तसेच सध्या मंजूर असलेले ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय हे लोकसंख्येच्या दृष्टीने अपुरे ठरणार असल्याने ते ५० खाटांचे करण्यात यावे, याबाबत डॉ.विजय कंदेवाड (संचालक, आरोग्य सेवा, पुणे) यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी ग्रामीण रुग्णालय लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येईल. तसेच ५० खाटांचे रूपांतर व १०८ मोफत ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, अशी ग्वाही देण्यात आली. याशिवाय कुंडलवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकार्‍यांची कमतरता भासत असून, तातडीने एक वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात यावा, अशी मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख (नांदेड) यांच्याकडे करण्यात आली. यावर तत्काळ वैद्यकीय अधिकारी देण्याबाबत अनुकूल प्रतिसाद मिळाला. दरम्यान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके साहेब (नांदेड) यांच्याशी देखील ग्रामीण रुग्णालयाबाबत चर्चा करण्यात आली असून, या प्रकरणाचा पाठपुरावा तातडीने करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.आरोग्य सेवांबरोबरच कुंडलवाडी शहरातील बालकांच्या पोषण व विकासासाठी नवीन १० अंगणवाड्या मंजूर करण्यात याव्यात, अशी मागणी जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, नांदेड यांच्याकडे करण्यात आली असून, यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे संकेत देण्यात आले आहेत.या सर्व चर्चांमध्ये नगराध्यक्षा प्रेरणा कोटलावार, गजानन कोटलावार तसेच नगरसेवक प्रतिनिधी संजय खुळगे उपस्थित होते. कुंडलवाडीकरांच्या मूलभूत आरोग्य व बालकल्याण सुविधांसाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांनी यावेळी सांगितले.

# मॅक्स लाईफ इन्शुरन्सचे अधिकारी असल्याचे भासवून वृद्धाला १४.२५ लाखांचा गंडा
## लासलगाव येथील सेवानिवृत्त अधिकार्‍याची फसवणूक; सायबर पोलिसांत गुन्हा दाखल

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** विमा कंपनीचे अधिकारी असल्याचे भासवून आणि पॉलिसीवर मोठे कमिशन मिळवून देण्याचे आमिष दाखवून, लासलगाव येथील एका ८२ वर्षीय सेवानिवृत्त अधिकार्‍याची १४ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नाशिक सायबर पोलीस ठाण्यात पाच संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

फिर्यादी रामराव रामचंद्र कौठे (वय ८२, रा. स्टेशन रोड, लासलगाव) हे सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी आहेत. २० नोव्हेंबर ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत संशयित आरोपींनी त्यांना व्हॉट्सअ‍ॅप आणि फोनद्वारे संपर्क साधला. आपण 'मॅक्स लाईफ इन्शुरन्स' कंपनीचे कर्मचारी व अधिकारी असल्याचे भासवून त्यांनी कौठे यांचा विश्वास संपादन केला.

**असे दाखवले आमिष :**

- इन्शुरन्स पॉलिसीवर एजंटचे ३० टक्के कमिशन मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

-कोरोना काळात कंपनीने १० लाख रुपये जमा केले असल्याचे सांगितले.

- असे एकूण २६ लाख ७१ हजार ७०६ रुपये मिळतील, असे




आमिष दाखवले.

**बनावट पावत्यांचा वापर :**

संशयितांनी कौठे यांना वेगवेगळ्या कारणांसाठी पैसे जमा करण्यास सांगितले. विश्वास बसवावा यासाठी कंपनीच्या नावाच्या बनावट पावत्याही त्यांना व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवण्यात आल्या. या भूलथापांना बळी पडून कौठे यांनी वेळोवेळी एकूण १४ लाख २५ हजार रुपये गुंतवले. मात्र, परतावा न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

**यांच्यावर झाला गुन्हा दाखल :**

या प्रकरणी सिमरन, रवी कपूर, गीता बॅनर्जी, विजयसिंग आणि अनिलकुमार दास या पाच जणांविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३१८(४), ३१९(२), ३(५) आणि माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (क), (ड) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नागेश मोहीते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# चंद्रपुरात ६ व ७ फेब्रुवारी २०२६ ला राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि चिंतामणी महाविद्यालय, घुग्घुस यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन आणि दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.६ व ७ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. 'मानवविद्याशाखेतील नवीन सिद्धांत, प्रवाह आणि व्यवहार' या मुख्य विषयावर देशभरातील विचारवंत मंथन करणार आहेत. दि. ६ फेब्रुवारीला पहिल्या सत्रात कोल्हापूरचे राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, डॉ.विठ्ठल दहिफळे (नांदेड), डॉ.परिमल माया सुधाकर (पुणे), डॉ.पी.डी.अप्पा देवरे (नाशिक) आणि ज्येष्ठ साहित्यिक तथा राजकीय विश्लेषक प्रा. सुरेश द्वादशीवार मार्गदर्शन करतील. ७ फेब्रुवारी दुसर्‍या सत्र विद्यापीठाचे डॉ.दीपक पवार, तंदूरवार (नागपूर), डॉ.अजय चंद्राकार (रायपूर), डॉ.विकास जांभुळकर (नागपूर), डॉ.श्याम शिरसाठ (संभाजीनगर) आणि डॉ.ब्रह्मदीप अलोणे (मध्य प्रदेश) हे तज्ज्ञ विचार आहेत. अध्यक्षस्थानी अड.राहुल घोटेकर तर मुख्य अतिथी म्हणून विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ‍शीराम कावळे, कुलसचिव डॉ.अनिल हिरेखन अधिष्ठाता डॉ.श्याम खंडाळे यांच्यासह डॉ.अलका देशमुख, डॉ.संजय गोरे, प्रशांत दोन्तुलवार, अशोक घोटेकर आणि वामनराव मोडक यांची राहणार आहे.

# भक्तीच्या दरबारात जुळले रेशीमबंध !
## आई-वडिलांचे छत्र नसलेल्या मनिषाचे मंदिर समितीने केले कन्यादान!
### रोहना येथे भागवत व अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात...

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** जिथे भक्तीचा मळा फुलतो तिथे माणुसकीचा झराही वाहतो याचा प्रत्यय नुकताच सावनेर तालुक्यातील रोहणा गावात आला. कन्हान नदीच्या काठावर असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी व पुंडलिक महाराज मंदिरात गेल्या ३२ वर्षांपासून भागवत व अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा जोपासली जात आहे. मात्र, यंदाचा सप्ताह केवळ मंत्रघोषानेच नाही तर एका भावूक सामाजिक बांधिलकीने अजरामर झाला.

२४ ते ३१ जानेवारी या कालावधीत आयोजित भागवत व अखंड हरिनाम सप्ताहात हभप संतोष महाराज निंबाळकर यांच्या रसाळ वाणीतून भागवत कथेचा अमृतवर्षाव झाला पण या सप्ताहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले ते म्हणजे चि. मनिषा आणि चि. अजय यांचा विवाह मनिषाच्या डोक्यावर आई-वडिलांचे छत्र नव्हते पण संपूर्ण रोहणा गाव तिचे कुटुंब बनून उभे राहिले मंदिर समितीने सामाजिक बांधिलकीची जाण ठेवत एका पित्याची भूमिका बजावली आणि मनिषाचे कन्यादान अतिशय थाटामाटात लावून दिले. विठू माऊली'च्या साक्षिने झालेल्या या विवाहाने उपस्थित हजारो भाविकांचे डोळे पाणावले. तसेच चनकापूर निवासी सैनिक भलावी यांनी ऑपरेशन सिंदूर युद्धात भाग घेतल्यामुळे त्यांच्याही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. सप्ताह दरम्यान केवळ अध्यात्मच नव्हे तर समाजसेवा हाच खरा धर्म मानून या सप्ताहात नेत्ररोग तज्ञ डॉ खोडे यांचे विनामूल्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताह दरम्यान दररोज पहाटे काकडा आरतीपासून ते रात्रीच्या हरिपाठापर्यंत संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. हभप ओम महाराज पाथरे, हभप त्र्यंबक महाराज आवारे, हभप सोपान महाराज पावरे, हभप अक्षय महाराज हरने, हभप किशोर महाराज ठाकरे, हभप देवानंद महाराज प्रधाने यांच्यासह अनेक दिग्गज कीर्तनकारांच्या प्रबोधनाने समाजमनावर संस्कारांची शिदोरी पेरली.





सप्ताहाची सांगता गोपालकाल्याच्या कीर्तनाने आणि भव्य महाप्रसादाने झाली परिसरातील सुमारे ५ हजार भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. लक्ष्मण महाराज सकरडे यांची विशेष 'झाँकी' आणि नितीन महाराज वानखेडे व निळकंठ महाराज गायकी यांच्या सुश्राव्य संगीताने या सोहळ्यात अधिकच रंगत भरली.

# खासदार लिंके यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

## स्व.अजितदादांच्या स्मरणार्थ पारनेरमध्ये राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन; कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर येथे स्व.अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि 'कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली' या भावनेतून खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे कृषी प्रदर्शन दि.१९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पारनेर बाजार समिती शेजारील मैदानावर भरविण्यात येणार आहे. खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत बुधवारी पारनेर येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.

या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामध्ये ट्रॅक्टर, आधुनिक शेती अवजारे, बी-बियाणे, रासायनिक, सेंद्रिय व जैविक खते, औषधे, ठिबक सिंचन, शेततळी, दूध काढणी यंत्रे, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधमाशी पालन, रोपवाटिका, पशुआहार आदी शेती व शेतीपूरक व्यवसायांशी संबंधित सर्व साहित्य व माहिती उपलब्ध होणार आहे. यासोबतच कांदा व ऊस पिकवाढीबाबत मार्गदर्शन तसेच नव्या ए.आय. तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात कृषी विद्यापीठ, जिल्हा व तालुका कृषी विभाग, आत्मा योजना तसेच विविध शासकीय बँकांचे माहितीपर स्टॉल्स असणार असून, शासकीय योजनांचा लाभ व तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी मिळणार आहे. प्रदर्शनाचे खास आकर्षण म्हणून जगातील एकमेव आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेली अवघी २ फूट ८ इंच उंचीची 'राधा' ही जगातील सर्वात बुटकी म्हैस पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहे.

महिलांसाठी गृह उपयोगी वस्तूंची दालने, लहान मुलांसाठी किड्स झोन तसेच सांगली, कोल्हापूर व कोकण भागातील प्रसिद्ध खाऊ गल्लीचे स्टॉल्स या ठिकाणी असणार आहेत. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा लाभ पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर, शिरूर, श्रीगोंदा व जुन्नर तालुक्यातील शेतकरी बांधवांना होणार असून सर्व शेतकरी, नवउद्योजक तरुण व महिलांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प्रदर्शनात प्रगतशील आदर्श शेतकरी, आदर्श शिक्षक, आदर्श उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, आदर्श सरपंच, आदर्श दुध डेअरी, आदर्श सहकारी सोसायटी या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहेत. तर प्रदर्शनाला भेट देणाऱ्या शेतकरी बांधवांसाठी खास दर एक तासाने लकि ड्रॉ आयोजित करणार आहेत. कृषी प्रदर्शनाचे यशस्वी नियोजन गेल्या ११ वर्षांपासून महाराष्ट्रात कृषी प्रदर्शनांचे आयोजन करणाऱ्या पी.जे.एम. इव्हेंट मॅनेजमेंट, काष्टीचे बंडू पाचपुते व गणेश जठार यांनी केले आहे.

# थोडक्यात

## शासनाचा महसूल बुडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करा; कामगार नेते रासकर यांची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील सुपा येथील म्हसणे फाटा फेज- २ औद्योगिक वसाहतीमधील महिंद्रा कंपनीमध्ये चालू असलेल्या गौण खनिज बाबत कुठलीही परवानगी आणि रॉयलटी काढली नसल्याने सदर कंपनीवर कारवाई करून ही कंपनी सील करण्यात यावी. तहसीलदार आणि गौण खनिज अधिकाऱ्यांनी कामाच्या स्थळी जाऊन माती उत्खनन आणि काम चालू करण्याची परवानगी काढली का? याची चौकशी करावी जर परवानगी काढली नसेल तर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी कामगार नेते रवि रासकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

युनिपेक पॅकेजिंग प्रा.लिमिटेड कंपनीवर यापूर्वी अनेक वेळा पाठपुरावा करूनही अद्यापही कुठलीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे अशा कंपनीवर प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अन्यथा गौण खनिज अधिकारी आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अन्यथा आंदोलन किंवा उपोषणाचा मार्ग अवलंब करावा लागेल,असा इशाराही रासकर यांनी दिला आहे. तहसीलदार आणि गौण खनिज अधिकाऱ्यांना १५ दिवसांपूर्वी युनिपेक पॅकेजिंग प्रा. लिमिटेड कंपनी बाबत पत्रव्यवहार केलेला आहे. त्य कंपनीमध्ये झालेल्या ब्लास्टींगबाबत परवानगी काढली आहे का? याची चौकशी व पंचनामा करून दोषी आढळल्यास योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. निवेदन देतेवेळी कामगार नेते रवि रासकर यांच्यासोबत दादाभाऊ थिटे, दिलिप दिवटे,राजू रासकर यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे केळी दिवस व शिवारफेरी कार्यक्रम उत्साहात संपन्न

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने केळी उत्पादनात व उत्पन्नात वाढ होईल - कुलगुरु डॉ.खर्चे

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०४, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ, दि.०४ फेब्रुवारी २०२६ रोजी केळी पिकामध्ये सुधारित लागवड पद्धतींच्या वापराबरोबर रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन केल्यास तसेच उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्यास उत्पन्नात निश्चितच वाढ होईल. नवीन संशोधन निष्कर्षांवर आधारित प्रयोगाची आणखी यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने केळी उत्पादनात व उत्पनात वाढ होईल असे प्रतिपादन महात्मा फले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे यांनी केले.



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे फुले कृषि महोत्सव-२०२६ अंतर्गत केळी दिवस व शिवारफेरी या कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे, धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे, नंदुरबार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.ए.बी.होले, मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.संदीप पाटील, जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड जळगावचे डॉ.के.बी.पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी जळगाव कुरबान तडवी, केळी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.अरुण भोसले, जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.दीपक दहाट व जळगाव कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.हेमंत बाहेती उपस्थित होते.

डॉ. गोरक्ष ससाणे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तांत्रिक चर्चासत्रामध्ये कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ.सुनील कदम यांनी नियंत्रित केळी उत्पादनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व ड्रोन वापर याविषयीचे प्रगत तंत्रज्ञान, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड यांनी केळी प्रक्रिया व उत्पादन, डॉ.के.बी.पाटील यांनी नियंत्रित केळी लागवडीतील आढळणारे अडथळे व उपाय, जळगावचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी जळगाव जिल्ह्यातील केळी पिकाची सद्यस्थिती व नियंत्रित आकडेवारी व कृषिविद्यावेता डॉ. उल्हास सुर्वे यांनी केळीसाठी जमीन आरोग्य व्यवस्थापन या विषयावर शेतकर्यांना मार्गदर्शन केले. यावेळी केळी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष संदीप पाटील व उपाध्यक्ष विनोद बोरसे यांनी उपस्थित शेतकर्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी आधुनिक केळी लागवड, संशोधन पुस्तिका, केळीवरील करपा, पनामा व कुकुंबर मोजक व्हायरस या विषयांवरील घडी पत्रिकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सेंद्रिय शेती करणार्या शेतकर्यांना आदर्श शेती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवारफेरीमध्ये उपस्थित असलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना देशभरात लागवडीखाली असलेल्या तब्बल ८० केळी वाणांची एकाच ठिकाणी प्रायोगीक लागवड संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर बघण्याची संधी मिळाली. यामध्ये फुले प्राईड, अर्धापुरी, वसई, श्रीमंती, ग्रँड नाईन, विल्यम्स, बसराई, राजापुरी इ. केळीच्या प्रगत वाणांच्या प्रात्यक्षिकांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात डॉ.अरुण भोसले यांनी विविध प्रयोग, देशी वाण, खत व्यवस्थापन व रोग व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव सूर्यवंशी यांनी तर आभार चंद्रशेखर गुळवे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले ४०० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## अजितदादा कायम स्मरणात राहतील - आ.जोरगेवार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** राज्याचे दिवंगत लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अस्थीकलश चंद्रपूर येथील श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आज अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अस्थीकलशाचे दर्शन घेऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अजितदादा कायम स्मरणात राहतील अश्या भावना यावेळी त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष राजीव कक्कड, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री नामदेव डाहुले, घुग्घुस नगर परिषदेचे नगरसेवक आशिष मासिरकर, राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्ष चारुशिला बारसागडे, कार्याध्यक्ष हेमांगिनी बिश्वास, विधानसभा अध्यक्ष सुनील काळे, युवक अध्यक्ष अभिनव देशपांडे, प्रतिमा ठाकूर तसेच भरत गुप्ता आदी उपस्थित होते.

यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा आज आपल्यात नाहीत, हे वास्तव स्वीकारणे अत्यंत कठीण आहे. त्यांच्या अचानक जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे स्पष्टवक्तेपणा, ठाम निर्णयक्षमता, प्रशासकीय अनुभव आणि जनतेशी असलेली घट्ट नाळ ही अजितदादांची खरी ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. अजितदादांचे कार्य अत्यंत व्यापक व दूरदृष्टी पूर्ण होते. त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात केवळ सत्तेपुरते मर्यादित न राहता लोकाभिमुख, विकासकेंद्रित आणि निर्णयक्षम राजकारणाचा वेगळा आयाम निर्माण केला. प्रशासनावर असलेली पकड, कामातील शिस्त, स्पष्ट भूमिका आणि ठामपणा ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये होती, अशा भावना यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते घडले आणि त्यांनी जबाबदाऱ्या समर्थपणे पेलल्या. राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय व राबवलेली धोरणे आजही मार्गदर्शक ठरत असून त्यांनी केलेले भरीव कार्य महाराष्ट्राच्या राजकारणात कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अजितदादा पवार यांचे योगदान अजरामर असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी सांगितले.

# खापरखेडा शहर आता सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत

## आमदार डॉ.देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

"शहराची सुरक्षा ही आमची प्राथमिकता आहे. केवळ खापरखेडाच नव्हे तर चिचोली, भानेगाव, चनकापूर, वलनी, दहेगाव (रंगारी), सिल्लेवाडा, पोटा, रोहना यासारख्या भागात ही टप्प्याटप्प्याने ही यंत्रणा कार्यान्वित केली जाईल."
– **डॉ.आशिष देशमुख** (आमदार, सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदार संघ.)

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा परिसरात वाढती गुन्हेगारी, चोरीच्या घटना आणि राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांचे सत्र रोखण्यासाठी खापरखेडा शहर आता पूर्णपणे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कक्षेत आले आहे.



सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे महानिर्मिती कंपनीच्या सीएसआर (उडठ) फंडातून १० अत्याधुनिक सोलर सीसीटीव्ही कॅमेरे मंजूर करण्यात आले असून त्याचे खापरखेडा शहरात यशस्वीरीत्या इन्स्टॉलेशन पूर्ण झाले आहे. खापरखेडा पोलीस ठाणे हे नागपूर शहर आयुक्तालयातील एक संवेदनशील ठाणे म्हणून ओळखले जाते. खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत आधी लावण्यात आलेले सीसीटीव्ही संच बंद पडले. त्यामुळे पोलिसांना गुन्ह्यांच्या तपासात मोठ्या अडचणी येत होत्या. सदर बाब लक्षात घेऊन भाजपा युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष आशिष फुटाने यांनी आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्याकडे पाठपुरावा केला होता. यावेळी देशमुख यांनी तातडीने महानिर्मिती प्रशासनाशी संपर्क साधून सीएसआर फंडातून सौरऊर्जेवर चालणारे कॅमेरे बसवण्याची मागणी लावून धरली.सौरऊर्जेवर चालणारे अत्याधुनिक कॅमेरे सिम कार्ड प्रणालीवर आधारित असल्याने त्यांच्या रिचार्जची आणि देखभालीची समस्या निर्माण झाली होती. खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांच्या विनंतीला मान देऊन चिचोली(खापरखेडा) ग्रामपंचायत प्रशासनाने ही जबाबदारी स्वीकारली. ग्राम पंचायतीने सिम कार्ड उपलब्ध करून देत दरमहा रिचार्जचा खर्च उचलण्याचा निर्णय घेतल्याने या प्रकल्पातील तांत्रिक अडथळा दूर झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नामोड, मुख्य बाजारपेठ, रेल्वे क्रॉसिंग, राष्ट्रीय महामार्गमहाराष्ट्र विद्यालय आदी शहराच्या मुख्य भागात सौरऊर्जेवर चालणारे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.या अत्याधुनिक सौरऊर्जा सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे आता खापरखेडा शहरात गुन्हेगारांवर वचक बसणार आहे, शिवाय वाहतुकीची कोंडी व अपघाताच्या घटनांवर नियंत्रण मिळविणे खापरखेडा पोलिसांना सोपे जाणार आहे. या कार्याबद्दल आमदार डॉ.आशिष देशमुख भाजयुमो अध्यक्ष आशिष फुटाने, सरपंच मीनाक्षी तागडे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांचे नागरिकांनी आभार मानले आहे.

## कळमना येथे कबड्डी स्पर्धेचा समारोप

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** कबड्डीसारखे पारंपारिक खेळ हे आपल्या संस्कृतीचे प्रतीक असून ते आपल्याला मातीशी जोडून ठेवतात. या खेळांमधून युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती बरोबर शिस्त, संघभावना, चिकाटी आणि नेतृत्वगुण विकसित होतात. त्यामुळे अशा खेळांचे जतन व संवर्धन करणे ही आजच्या काळाची अत्यंत गरज आहे, असे ठाम प्रतिपादन काँग्रेस नेते तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दिनेश दादापाटील चोखारे यांनी केले. बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथे नवयुवक क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेच्या समारोप व बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य संधी, मैदाने. प्रशिक्षक व आर्थिक पाठबळ मिळाल्यास ते राज्य व राष्ट्रीय पातळीवर निश्चितच यश मिळवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. पारंपारिक खेळांना चालना देण्यासाठी सामाजिक संस्था, क्रीडा मंडळे व स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ही त्यांनी केले. स्पर्धेच्या अतिम सामन्यातील विजेत्या व उपविजेत्या संघांचा मान्यवरांच्या हस्ते चषक, पदके व रोख बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. खेळाडूंनी दाखवलेल्या चुरशीच्या खेळामुळे उपस्थित क्रीडा प्रेमींमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता.

संपूर्ण परिसरात क्रीडा उत्सवाचे वातावरण अनुभवायला मिळाले.या कार्यक्रमाला बल्लारपूर काँग्रेस कमिटीचे ग्रामीण तालुकाध्यक्ष गोविंद उपरे, सामाजिक कार्यकर्ते भास्कर कावळे, सामाजिक कार्यकर्त्या सोनाली भास्कर कावळे (बांगडे), बल्लारपूर काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा नाजुका हनुमान आलाम, गणपती नेवारे, राजेश मोरे, कळमना ग्रामपंचायतच्या सदस्या छाया तलांडे, सदस्य रेनकुंटलवार, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कबड्डी स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी नागरिक, माजी खेळाडू, प्रशिक्षक, युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कळंबोली मध्ये अतिक्रमण व अनधिकृत बॅनरवर तोडक कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, पनवेल :** गेल्या दोन दिवसांपासून पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ब कळंबोली हद्दीतील सेक्टर १ई, केएलई महाविद्यालय परिसर, सेक्टर ३ई याठिकाणी नव्याने फूटपाथवर स्थापन करण्यात आलेल्या स्टॉल, टपरी यांच्यावर तोडक कारवाई करण्यात आली आहे. तसेच आज दिनांक ४ फेब्रुवारी रोजी प्रभाग समिती ब मधील विविध ठिकाणी अनधिकृत बॅनरवर धडक कारवाई करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार प्रभाग समिती ब चे प्रभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर व प्रभारी अधिक्षक राजेश डोंगरे यांनी अतिक्रमण विभागाच्या साह्याने ही कारवाई केली. या कारवाई दरम्यान सेक्टर १, केएलई महाविद्यालय परिसर, सेक्टर ३ई मधील फुटपाथवरील अतिक्रमणांवर तसेच ०४ नव्याने उभारण्यात आलेल्या टपऱ्यांवरती तोडक कारवाई करण्यात आली. तसेच खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पु), कळंबोली व रोडपाली या भागातील सुमारे ४५ अनधिकृत बॅनरवर धडक कारवाई करण्यात आली.

# थोडक्यात

## दुसऱ्या फेडरेशन कप तायक्कानडो स्पर्धेत मुंबईच्या खेळाडूंची प्रशंसनीय कामगिरी



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२७, मुंबई :** जयपूर, राजस्थान येथे दुसरी फेडरेशन कप तायक्कानडो २०२५-२६, एस.एम. एस. स्टेडियम, जयपूर, राजस्थान येथे संपन्न झाली. सदर स्पर्धेच्या उदघाटन सोहळ्यास हरिभाऊ बगाडे (गव्हर्नर -राजस्थान), अशोक परणामी, (अध्यक्ष राज्य फॉर्मर, भाजपा), सुभाष मील (लेजिस्लेटिव्ह असेम्ब्ली. खंडाळा, सिकर),नीरज पवन (सेक्रेटरी - युथ अफिअर्स आणि स्पोर्ट्स डिपार्टमेंट), शंकर गोरा (अध्यक्ष - भाजपा युवा मोर्चा, राजस्थान), शाहझाद खान (सेक्रेटरी - राजस्थान तायक्कांडो), संदीप ओंबासे (अध्यक्ष - तायक्कानडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र) यांची उपस्थिती होती.सदर स्पर्धेत मुंबई शहरातून १९ खेळाडू महाराष्ट्र संघांचे प्रतिनिधित्व करीत होते त्यात क्युरोगी स्पर्धेत ऋत्वी गायकवाड हिने रौप्य पदक मिळवले असून, पुमसे स्पर्धेत काव्य धोडायनोर याने वैयक्तिक गटात - कांस्य पदक, विहान अय्यर व ताईशा अय्यर यांनी, पेअर (जोडी) गटात - कांस्य पदक प्राप्त केले. ह्या स्पर्धेतील वरिष्ठ (सिनियर) गटातील सुवर्ण पदक विजेते खेळाडुंची निवड आगामी होणाऱ्या २०व्या आशियाई गेम्स स्पर्धेमध्ये होणार आहे. महाराष्ट्र संघाने ४१२० गुण मिळवून प्रथम क्रमांकाचे उच्च स्थान काबीज केले असून संपूर्ण महाराष्ट्र संघांसाठी संघ प्रशिक्षक म्हणून मुंबईच्या सिद्धेश घाग यांनी कामगिरी केली. मुंबईच्या खेळाडूंवर सर्वत्र अभिनंदनाचा व वर्षाव होत आहे. संपूर्ण संघास विशेष मार्गदर्शन भास्कर करकेरा (मुंबई अध्यक्ष तथा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते), संदिप ओंबासे (अध्यक्ष - तायक्कानडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र), अमजद खान (गफार) पठाण - (महासचिव), डॉ.प्रसाद कुलकर्णी (खजिनदार) यांचे लाभले. खेळाडुंनी मिळवलेल्या यशाबद्दल मुंबई जिल्हा संघटना महासचिव विल्सन वरळीकर, आंतरराष्ट्रीय पंच उषा शिर्के - धामणसकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेश खिल्लारे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रेमकुमार शेष्ठ, सहाय्यक विरेंद्र गायकवाड, सुनिल साखरकर व संपूर्ण पालक वर्ग यांच्या वतीने कौतुकास्पद प्रशंशा केली जात आहे.

## निलेश अनभवणे यांना राष्ट्रीय सत्यमेव जयते सन्मान २०२६ प्रदान




**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२६, ठाणे :** २६ जानेवारी २०२६ भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पावन पर्वावर ठाणे, महाराष्ट्र येथील साहित्य संपादक व समाजसेवक निलेश यशवंत अनभवणे यांना त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राष्ट्रीय सत्यमेव जयते सन्मान २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. ट्रायकलर नेशन फाउंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार सत्य की शक्ती, राष्ट्र की प्रगती या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित असून, सत्य, निष्ठा आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान केला जातो. निलेश अनभवणे यांनी आपल्या संवेदनशील साहित्यिक लेखनातून तसेच सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमांद्वारे सांस्कृतिक जाणीव, बौद्धिक प्रगल्भता व सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केला आहे. समाजसेवा, मूल्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी ही त्यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. हा सन्मान ट्रायकलर नेशन फाउंडेशनचे संचालक डॉ. राजीव देशपांडे व व्यवस्थापक कविता मल्होत्रा यांच्या स्वाक्षरीने दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार निलेश यशवंत अनभवणे यांच्या समाजासाठीच्या निष्ठावंत सेवेला दिलेली राष्ट्रीय पातळीवरील पोचपावती असून, नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या युवकांचा सत्कार संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील युवकांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार सोहळा स्वामी विवेकानंद अनाथ आश्रम शाळा, रामपूर येथे २६ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. या प्रसंगी ॲड.दीपक चटप यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत युवकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या युवकांनी कठोर परिश्रम, चिकाटी व देशसेवेची भावना ठेवून हे यश संपादन केल्याबद्दल उपस्थित दिलीप देरकर (उपनगराध्यक्ष न.प.राजुरा), दिलीप देठे (उपसरपंच ग्रा.प.भुरकुंडा बूज), स्वप्नील मोहुर्ले (नगरसेवक, राजुरा), शेषराव बोंडे, मारोती लांडे, या सर्व मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. शेतकरी कुटुंबातून येऊन देशाच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे ही अभिमानाची बाब असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या सत्कार सोहळ्यास युवकांचे मित्र व विविध क्षेत्रातील सहकारी किशोर देरकर, दीपक देरकर, खुशाल अडवे, प्रमोद राठोड, सुरज गव्हाणे, साईनाथ पिंपळशेंडे, लक्ष्मण कुळमेथे, सौरभ मादासवार मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मानसी हाइट्स सोसायटीत सत्यनारायण महापूजा उत्साहात संपन्न

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली (पूर्व) येथील आजदेगाव परिसरातील मानसी हाइट्स सहकारी गृहनिर्माण संस्थेत दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन मोठ्या भक्तिभावात व उत्साहात करण्यात आले. सदर सत्यनारायण महापूजा केतन माने व अनिता माने यांच्या हस्ते संपन्न झाली. सोसायटीच्या वतीने आयोजित या महापूजेला सर्व रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या धार्मिक कार्यक्रमास विभागातील माननीय नगरसेवक विनोद काळण साहेब तसेच दानशूर व्यक्तिमत्त्व असणारे वासुदेव पाटील व मयुरेश खंडेलवाल यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. महापूजेनंतर विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भजन कार्यक्रम, महिलांसाठी स्पर्धा, हळदी-कुंकू समारंभ, लहान मुलांसाठी विविध स्पर्धा तसेच रेकॉर्ड डान्स यांचा समावेश होता. सायंकाळी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम शांततामय, शिस्तबद्ध व आनंदी वातावरणात पार पडला. या निमित्ताने मानसी हाइट्स सोसायटीतील सर्व रहिवाशांनी एकत्र येत धार्मिक व सामाजिक एकतेचा सुंदर आदर्श घडवला.

# सोयगाव तालुक्यात गटात ११ व गणात १२ उमेदवारांची माघार

### ९ जागांसाठी ३७ उमेदवार रिंगणात

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२७, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव तालुक्यात तीन गट आणि सहा गणांसाठी मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा अंतिम दिवशी जिल्हा परिषदेच्या ३ गटात ११ तर ६ गणात १२ असे एकूण २१ उमेदवारांनी निवडणुकी मधून माघार घेतली असून ३ गटांसाठी ११ तर ६ गणांसाठी २६ उमेदवार रिंगणात असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी रूपेश सिनगारे यांनी सांगितले. सोयगाव तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिनगारे, सहायक मनिषा मेने यांनी माघारीची प्रक्रिया राबविली मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा अंतिम दिवशी २१ जणांनी माघार घेतली आहे. दरम्यान एकूण५९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरविण्यात आले होते. त्यापैकी गटात २२ तर गणात ३८ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. परंतु माघारीच्या अंतिम दिवशी २१ उमेदवारांनी माघार घेतली आहे.

यामध्ये फरदापुर गणातून दोन, सावळदबारा गणातून तीन, आमखेडा गणातून एक, निंबायती गणातून तीन, बनोटी गणातून तीन,गोंदेगाव गणातून एकही उमेदवारी अर्ज माघार झाला नाही. त्यामुळे या गणात उद्धव सेना, भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित पवार अशी बहुरंगी लढत रंगली आहे फरदापुर गणात शिंदे सेना व भाजप यांच्यात सरळ लढत होत आहे. सावळदबारा गणात एका अपक्ष सह भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी शरद पवार,बसपा, उद्धव सेना अशी लढत होत आहे.

आमखेडा गणात भाजप, शिंदेसेना, वंचित बहुजन अशी तिरंगी लढत होत असून निंबायती गणात शिंदे सेना,भाजप, राष्ट्रवादी अजित पवार, बसपा आणि उद्धव सेना अशी बहुरंगी लढत आहे तर फरदापुर गटातून चार जणांनी माघार घेतली आहे. या गटात भाजप, शिंदेसेना आणि वंचित बहुजन अशी तिरंगी लढत होत आहे आमखेडा गटातून एकही माघार झाली नाही. या गटात शिंदेसेना, भाजप आणि बसप यांच्यात तिरंगी लढत होत आहे गोंदेगाव गटातून दोघांनी माघार घेतली आहे,परंतु या गटात भाजप, शिंदेसेना, उद्धव सेना, राष्ट्रवादी अजित पवार, राष्ट्रवादी शरद पवार अशी लढत होत आहे.

# पुढील महिन्यात म्हाडाची सर्व सामान्यांसाठी तब्बल ३ हजार घरांची लॉटरी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, मुंबई :** दरवर्षी म्हाडाच्या घरांची लॉटरीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या सर्वसामान्य मुंबईकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची प्रक्रिया संपल्यानंतर लगेचच म्हाडाच्या मुंबई मंडळाने सुमारे ३ हजार घरांची लॉटरी काढण्याची तयारी सुरू केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही लॉटरी मार्चमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे.

प्रत्येक इंच जागेला सोन्याचा भाव असणाऱ्या मुंबईत परवडणाऱ्या दरात स्वत:चं हक्काचं घर घेण्यासाठी सामान्य नागरिक म्हाडाच्या लॉटरीच्या प्रतीक्षेत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये म्हाडाने मुंबईतील मोक्याच्या जागांवर सर्वसामान्यांना अत्यंत माफक दरात घरे उपलब्ध करुन दिली आहेत. या घरांची किंमत बाजारभावापेक्षा कैकपटीने कमी असते. त्यामुळे सामान्य मुंबईकर कायमच आपल्याला म्हाडाचे घर लागू दे, अशी प्रार्थना करत असता. येत्या काही दिवसांमध्ये मुंबईकरांची ही इच्छा पूर्ण होऊ शकते. मार्च महिन्यात म्हाडाकडून घरांसाठी लॉटरी काढली जाऊ शकते. मात्र, या लॉटरीत मुंबईतील नेमक्या कोणत्या भागातील घरांचा समावेश असेल, याची नेमकी माहिती अद्याप समोर आलेली नाही.

याशिवाय, म्हाडाच्या कोकण मंडळाच्या सुमारे ४ हजार घरांची लॉटरी काढली जाणार आहे.दरम्यान गेल्या ७६ वर्षांत म्हाडाने राज्यात सर्वसामान्यांना सुमारे ९ लाख परवडणारी घरे दिली आहेत. बी.डी.डी. चाळ, मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्प, जी.टी.बी. नगर येथील पंजाबी कॉलनी, पत्राचाळ, अभ्युदय नगर, पूनम नगर, अंधेरीतील सरदार वल्लभभाई पटेल नगर आदी प्रकल्प नियोजनाच्या टप्प्यात आहेत. म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या घरांना सर्वाधिक मागणी असते, तर कोकण मंडळाच्या घरांनाही चांगला प्रतिसाद मिळतो.




मात्र, कोकण मंडळाच्या काही प्रकल्पांच्या परिसरात अद्याप पायाभूत सुविधा पूर्णपणे विकसित झाल्या नाहीत. त्यामुळे येथील घरांबाबत लॉटरीनंतर नाराजी असते. प्राधिकरणाने रस्ते, पाणी, वीज आदी पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले असून, घरांच्या किमती ही कमी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे पुढील लॉटरीत कोकण मंडळाच्या घरांना चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

# महाबळेश्वर मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२६, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे उत्साहात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. गिरिस्थान नगरपरिषद येथे नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. सुभाषचंद्र बोस चौक येथे उपनगराध्यक्ष नासिर भाई मुलाणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका, मुख्याधिकारी योगेश पाटील तसेच सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शासकीय कर्मचारी विद्यार्थी तसेच मान्यवर या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाबळेश्वर तहसीलदार कार्यालय येथे सचिन मस्के, पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी विजय विभुते यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयात पो.



नि. बापूसाहेब सांडभोर, वनविभाग महाबळेश्वर येथे वनक्षेत्रपाल तर महाबळेश्वर अर्बन बँक येथे अध्यक्ष समीर सुतार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महाबळेश्वर नगरपरिषद येथे नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्या नंतर शालेय बँड पथकासोबत प्रभात फेरीस सुरुवात झाली.

ही प्रभात फेरी नगरपरिषद पासून सुभाष चौक मध्ये आली. यावेळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे सुभाष चंद्र बोस व यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यानंतर विद्यार्थी शिक्षक नगरपरिषद कर्मचारी तसेच इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत महाबळेश्वर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष नासिर भाई मुलाणी यांच्या हस्ते सुभाषचंद्र बोस चौका मध्ये ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी येथील सुभाष चौकात नगरवासियांची तसेच पर्यटकांची अलोट गर्दी झाली होती.

यानंतर मुख्य बाजार पेठ मार्गे शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी मुख्य बाजार पेठ मार्गे पोलीस परेड ग्राउंड येथे आली. पोलीस ग्राउंड येथे शालेय विद्यार्थ्या मार्फत मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. शिस्तबद्ध कवायत कार्यक्रम सादर करण्यात आला. याचबरोबर महाबळेश्वर नगरपरिषदे मार्फत प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस परेड ग्राउंड येथे सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन शून्य कारभाराचा निषेध

### प्रजासत्ताक दिनी बुलढाणा जिल्ह्याचा घोर अपमान



**अक्षराज : रविंद्र सुरूशे**

**दि.२७, मेहकर (बुलढाणा) :** भारताचा प्रजासत्ताक दिन हा जिल्हाभरात नव्हे तर संपूर्ण भारत देशात उत्साहात संपूर्ण झाला. परंतु यामध्ये बुलढाणा जिल्ह्यात अतिशय जिल्ह्याला लाजवेल व जिल्ह्याचा अपमान होईल अशी घटना प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी घडली. असा आक्षेप महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री तथा बुलढाणा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री सुबोध भाऊ सावजी यांनी केला आहे. जिल्ह्यात ध्वजवंदनाचा उत्साहामध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री हे आले नाही. या कृतीतून महाराष्ट्र शासनाच्या अतिशय नियोजन शून्य ढिसाळ कारभार समोर आला आहे. एवढा मोठा सण असून महाराष्ट्र शासनाचा प्रतिनिधी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले नाहीत हा बुलढाणा जिल्ह्याचा अपमान आहे. तसेच जिल्ह्यात केंद्रीय मंत्री माननीय प्रतापरावजी जाधव हे जिल्ह्यातच असताना सुद्धा त्यांना बोलवण्यात आले नाही.

पालकमंत्री हे आजारी होते मग केंद्रीय मंत्री जिल्ह्यातळॲ असताना सुद्धा त्यांना बोलावले नाही. जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण केले. एवढीच जर त्यांना हौस होती. जिल्हाधिकाऱ्यांनी हे जाणून-बुजून केले की, नाविलाजाने केले याची चौकशी व्हावी. जर जिल्हाधिकाऱ्यांना समजले की पालकमंत्री झेंडावंदनासाठी येत नाही तर मग त्यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना का सांगितले नाही? याची सखोल चौकशी होऊन अप्पर सचिव यांना निलंबित करावे. किंवा जिल्हाधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करावी अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध भाऊ सावजी यांनी केली आहे. अन्यथा आम्हाला आंदोलनाचे शस्त्र उभाराव लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

## १५० दिवसांचा कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श; धाराशिव जिल्हा राज्यात तृतीय

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, धाराशिव :** राज्य शासनाने प्रशासनात अधिक पारदर्शकता, गतिमानता निर्माण व्हावी तसेच नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शासकीय उपक्रम व सुविधांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने १५० दिवसांचा विशेष कृती कार्यक्रम राबविला.या कार्यक्रमांतर्गत सर्व उपक्रम प्रभावीपणे व गुणवत्तापूर्ण रीतीने अंमलात आणण्यासाठी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्व व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार धाराशिव जिल्ह्यात प्रशासन अधिक सक्षम,तंत्रज्ञानस्नेही व नागरिककेंद्रित करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या.

यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणाली, तुळजाई चॅटबॉट, कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर प्रणाली तसेच जीवनरेखा प्रणाली या महत्त्वाच्या डिजिटल उपक्रमांचा समावेश आहे. डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणालीद्वारे जिल्ह्यातील विविध विभागांच्या शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले आहे.या प्रणालीमुळे योजनांची उद्दिष्टपूर्ती, प्रगतीवर सतत लक्ष ठेवणे व वेळेत पाठपुरावा करणे अधिक कार्यक्षम पद्धतीने शक्य झाले असून प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे.

**तुळजाई चॅटबॉट** - ही प्रणाली नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.या माध्यमातून पुरवठा विभाग, संजय गांधी योजना, नैसर्गिक आपत्ती,आपले सरकार सेवा केंद्रावरील सेवा याबाबतची माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. जिल्हा संकेतस्थळाशी संलग्न असलेल्या या प्रणालीवरून नागरिक घरबसल्या आवश्यक कागदपत्रांची माहिती, योजना पात्रता तसेच शंकांचे तात्काळ निरसन करू शकतात. मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकावर सहज वापरता येणाऱ्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचून प्रशासन अधिक गतिमान झाले आहे.

